अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **रत्नाकर मधुकर माने** |
| वय सुमारे | : | ५९ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त |
| निवासस्थान | : | वाघोडे, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>:**

सन २०२१ मध्ये मी परिमंडळ, तिनविरा येथे वनपाल म्हणून कार्यरत होतो. मौजे गान तर्फे श्रीगांव मधील सर्व्हे क्र. २१/१/ब क्षेत्र ०.३०.०० ही जागा मारुती रामजी पाटील यांच्या नावे आहे. फेरफार क्र. २५६ दि. २०/१०/१९९८ च्या आदेशान्वये महाराष्ट्र शासन मानीव राखीव वन यांच्या ताब्यात हे क्षेत्र आले व याबाबतची नोंद ७/१२ च्या उता–यामध्ये आहे. सदर जागेबाबत प्रकाश म्हात्रे यांनी ऑनलाईन तक्रारी अर्ज प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांच्याकडे केला होता. सदर अर्जामध्ये मारुती पाटील यांनी सदर जागेत अतिक्रमण केल्याचे नमूद केले होते. त्या अनुषंगाने माझे वरिष्ठ परिक्षेत्र वन अधिकारी, अलिबाग यांनी जागेवरील वस्तुस्थितीची पाहणी करुन अहवाल देण्याचे मला आदेश दिले होते.

०२. सदर जागेवर जावून दि. २५/०६/२०२१ रोजी मारुती पाटील यांच्यासमक्ष जागेवरील केलेल्या अतिक्रमणाचा पंचनामा करुन त्याचे मोजमाप घेतले. सदर जागेत 'साडेचार आनंदवन' या नावाचे हॉटेल–रेस्टॉरंट व त्यांचे राहते घर, दोन पाकी शेड इत्यादी कामे केलेली आढळली. सदरचे क्षेत्र ०.३०.०० हे.आर. मध्ये १८.६८ हे.आर क्षेत्रात वनेतर कामे केल्याचे दिसले. तसा

पंचनामा करुन मारुती रामजी पाटील यांचा जबाब घेतला. पंचनाम्यावर व जाबाबावर त्यांच्या सह्या घेतल्या. पंचनाम्यातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. पंचनामा **निशाणी क्र. २४** वर आहे.

०३. सदर जमीन तत्कालीन मूळ मालक कृष्णा गणू ठाकूर यांना सन १९६३ मध्ये नोटीस बजावण्यात आली होती. परंतु राधाबाई ठाकूर यांच्याकडून मारुती रामजी पाटील यांनी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांच्या परवानगीने सन १९९७ मध्ये खरेदीने घेतले. सदर जागेच्या पूर्व, पश्चिम व उत्तर दिशेला घोडे यांची जमीन आहे व दक्षिणेला तुकाराम गणू ठाकूर यांची जमीन आहे. त्यानंतर मी तक्रार दाखल केली. वनक्षेत्रपाल, अलिबाग यांनी सुद्धा मारुती रामजी पाटील यांचा जबाब घेतलेला आहे. तक्रारीसोबत ७/१२ चा उतारा व इतर कागदपत्रे दाखल केलेली आहेत. मी जागेचे फोटो व जी.पी.एस्. नकाशा घेतलेला आहे. चौकशी पूर्ण करुन केलेला अहवाल मी दाखल केलेला आहे. सदर अहवाल दाखल आहे. सदर अहवालातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. सदर अहवाल **निशाणी क्र. २५** वर आहे. क्षेत्राबाबतचा हाताने काढलेला नकाशा दाखल केलेला आहे. त्यावर माझी सही आहे. सदर नकाशा **निशाणी क्र. २६** वर आहे. मी सदर गुन्ह्याबाबत अपराधाचे पहिले प्रतिवृत्त दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. सदर प्रतिवृत्त **निशाणी क्र. २७** वर आहे.

०४. वनखात्याच्या जागेवर 'साडेचार आनंदवन' नावाचे रेस्टॉरंट, राहते घर, पाण्याची टाकी, दोन पाकी शेड व तरण तलाव असल्याचे दिसून आले.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. आर. बी. कोसमकर यांचेमार्फत</u>** :

०५. सन २०१८ ते डिसेंबर–२०२२ पर्यंत मी परिमंडळ वन अधिकारी, तिनविरा येथे कार्यरत होतो. साडेचार आनंदवन पासून ते वाघोडे येथील माझ्या राहत्या घरातील अंतर अंदाजे ०३ कि.मी. आहे. आरोपीचे घर मुख्य रस्त्याला लागून आहे. सन १९९७ पासून त्यांचे घर तेथे आहे, हे मी बघितले नाही.

०६. सन १९५३ मध्ये सदर जागेचे कृष्णा गणू ठाकूर हे संरक्षित कुळ होते. त्यावर्षी ७/१२ च्या उता–यावर वनखात्याची नोंद नव्हती. सन १९६१ मध्ये फेरफार क्र. ९३ नुसार ३२ग प्रमाणे कुळकायद्याची रक्कम ठरली. त्यानंतर राधाबाई ठाकूर फेरफार क्र. २३२ नुसार सन १९९५ मध्ये सदर जागेच्या मालक झाल्या. (आरोपीच्या वकीलांनी सदर नोंदी साक्षीदाराला निर्दिष्ट केल्यामुळे त्यांना निशाणी क्रमांक देण्यात येत आहेत.) सदर नोंदी **निशाणी क्र. २८** ते **३०** वर आहेत. फेरफार क्र.२४२ नुसार आरोपीने राधाबाई ठाकूर यांच्याकडून दि. ०७/०७/१९९७ रोजी सदर जमीन विकत घेतली. सदर नोंद **निशाणी क्र. ३१** कडे आहे. सदर नोंदीनुसार आरोपीचे सदर जमीनीला नाव लागले. त्यावेळी सदर जमीनीला वनखात्याचे नाव लागलेले नव्हते.

०७. फेरफार क्र. २५६ प्रमाणे सन १९९८ मध्ये पहिल्यांदा सदर जमीनीला वनखात्याचे नाव लागले. पूर्वीच्या नोंदी वनखात्याने रद्द करुन घेतल्या होत्या किंवा कसे? हे मला माहीत नाही, तसेच याबाबत मी चौकशी सुद्धा केली नाही. खरेदीखत ज्यावेळी झाले होते त्यावेळी उपविभागीय अधिकारी यांनी त्याबाबत आदेश दिले होते. सदर आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. त्यानंतर खरेदीखत झाले होते. सन १९९८ मध्ये ७/१२ च्या उता–यात इतर हक्कामध्ये

कलम २२अ च्या चौकशीसाठी प्रलंबित असा शेरा मारलेला आहे. सदर कलमांतर्गत चौकशी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे होते व त्यांनीच विक्रीची परवानगी दिलेली आहे. सदर मिळकत सन १९९६ मध्ये वनविभागाची नव्हती त्यामुळे त्यांनी परवानगी दिली होती. कलम २२अ अंतर्गत या प्रकरणात उपविभागीय अधिका—यांकडे चौकशी चालू आहे व ती प्रलंबित आहे. जोपर्यंत चौकशीचा निकाल येत नाही तोपर्यंत सदर जमीन मारुती पाटील यांची आहे किंवा वन खात्याची आहे हे ठरवता येत नाही, हे मी सांगू शकत नाही.

०८. दि. २५/०५/२०२१ रोजी प्रकाश म्हात्रे यांनी माझ्या वरिष्ठांकडे नागपूर येथे तक्रार दिली होती. माझ्या कालावधीत सदर अर्ज येण्यापूर्वी वनविभागाने या जागेबाबत कोणतीही कारवाई केली नव्हती. माझ्या काळात माझ्याकडे आरोपीबाबत कोणतीही तक्रार आली नव्हती. मी प्रकाश म्हात्रेला भेटलेलो नाही. मी प्रकाश म्हात्रेचा जबाब घेतलेला नाही व त्याने केलेल्या ऑनलाईन तक्रारीची सत्यता पडताळून बघितली नाही. मी आरोपीच्या जागेत गेलेलो नाही.

०९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने त्याचा जबाब दिला नव्हता.

प्रश्न : ते तुमच्या कार्यालयात सही करायला आले नव्हते?

उत्तर : त्यांची सही जागेवर घेतली.

हे म्हणणे खरे नाही की, त्यांची सही जागेवर घेतली, हे मी खोटे सांगत आहे. आरोपीच्या जागेत नारळाची, आंब्याची मोठी झाडे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने वनखात्याच्या जमिनीमध्ये कोणतेही बांधकाम केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या जागेत त्यांचे शेतघर असून ते तेथेच व्यवसाय करतात. मी

आरोपीला वन अधिनियमाचे कलम ३५ प्रमाणे नोटीस पाठविली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन वनखात्याची नसून आरोपीच्या वैयक्तीक मालकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे जबाब घेतलेले असून खोटी तक्रार दाखल केली आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष

( **शै. वा. उगले** ) ( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.
दिनांक : **०७/०८/२०२३**.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **उस्मानगणी शहाबुद्दीन शेख** |
| वय सुमारे | : | ५६ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| सध्या नेमणूक | : | वनरक्षक, पाली, ता. कर्जत |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>:**

मी सध्या वनरक्षक पाली, ता. कर्जत येथे कार्यरत आहे. सन २०२१ मध्ये मी वनरक्षक, तिनविरा म्हणून कार्यरत होतो. परिमंडळ कार्यक्षेत्र, तिनविरा येथे

तक्रार प्राप्त झाली होती. तक्रार म्हात्रे यांनी आरोपीविरुद्ध केली होती. त्या अनुषंगाने दि. २५/०६/२०२१ रोजी मी, परिमंडळ अधिकारी, तिनविरा, वनरक्षक गोपोली व दोन पंच असे आम्ही मौजे गाण तर्फे श्रीगांव सर्व्हे क्र. २१/१/ब येथे गेलो होतो. सदरचा सर्व्हे क्रमांक मारुती रामजी पाटील यांच्या मालकीचा आहे.

०२. तेथे गेल्यानंतर आरोपीला बोलावून चौकशी केली होती. त्यांनी त्यांच्याकडे असलेले ७/१२ उतारे, नकाशा, गटस्कीमचे उतारे इत्यादी दाखवले होते. तक्रार व माझ्या वरिष्ठांचे आदेश मी पंचांना वाचून दाखवले. आम्ही सदर सर्व्हेची पाहणी केली असता तेथे 'साडेचार आनंदवन' या नावाचे रेस्टॉरंट बांधलेले दिसले. रेस्टॉरंटला लागून त्यांचे राहते घर, तरणतलाव, दोन रेस्ट हाऊस, दोन पत्र्यांची शेड, एक दुपाकी शेड व भातशेती आम्हाला दिसले. सदरचे बांधकाम एकूण ०१८.६८ हे.आर. एवढ्या क्षेत्रफळात होते. आरोपीचा जबाब नोंदवलेला आहे.

०३. आम्ही सदर जागेवर सकाळी १०.०० वाजता गेलो होतो व ३.०० वाजेपर्यंत तेथे होतो. सर्व्हे क्र. २१/१/ब हे महाराष्ट्र शासन मानीव राखीव वन म्हणून घोषीत केलेले आहे. पंचनामा निशाणी क्र. २४ दाखल आहे. परिमंडळ वनक्षेत्र अधिकारी यांच्या समक्ष माझा जबाब नोंदवलेला आहे. जबाबामध्ये सदर गुन्ह्याकामी चौकशी करण्यासाठी मदत करणे व कागदपत्र बनविणे याबाबतीत मदत केली असे सांगितले आहे. जबाबातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. तो **निशाणी क्र. ३७** वर आहे.

०४. मी सदर जागेचे फोटोग्राफ्स् काढलेले आहेत व जी.पी.एस्. मशिनद्वारे सदर क्षेत्राचा पॉलीगॉन काढलेला आहे. कार्यालयात जावून संगणकामध्ये सदर

माहिती डाऊनलोड करुन त्याची प्रिंट काढलेली आहे. मी माझ्या मोबाईलमधून फोटोग्राफ्स् काढलेले आहेत व त्याबाबत प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. प्रमाणपत्रातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. ते **निशाणी क्र. ३८** वर आहे. आरोपीला मी ओळखतो.

**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. आर. बी. कोसमकर यांचेमार्फत** :

०५. जून–२०१९ ते जून–२०२३ पर्यंत मी वनरक्षक, तिनविरा म्हणून कार्यरत होतो. तक्रार निश्चित कोणत्या तारखेला कार्यालयात आली होती हे मी सांगू शकत नाही. सन २०२१ मध्ये तक्रार प्राप्त झाली होती तारीख मला माहीत नाही. प्रशांत म्हात्रेंनी तक्रार दिली होती.

०६. तक्रार प्राप्त होईपर्यंत आरोपीविरुद्ध सदर सर्व्हेबाबत कोणतीही कारवाई केली नव्हती. सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासनाचे मानीव राखीव वन आहे हे मला माहीत नव्हते.

०७. मी प्रकरणातील कागदपत्रे बघितलेली आहेत. सदरची मिळकत आरोपीने खरेदीखताद्वारे विकत घेतलेली आहे. सन १९९८ पर्यंत सदर जागेबाबत वनखात्याच्या दप्तरी नोंद नव्हती. मी वनपाल माने यांची साक्ष वाचलेली नाही. सचिन नाईक व दत्तात्रेय नाईक असे दोन पंच होते. तालुका भूमी अभिलेख यांना बोलावले नवहते. सदर जागेचे मालक आरोपी आहेत याची शासन दप्तरी चौकशी करुन मी खात्री केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वनपरिमंडळ अधिकारी माने हे घटनास्थळी गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी जागेवर गेलेलो नसून

कार्यालयात बसून खोटा पंचनामा तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जागेवर मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे बांधकामे केली होती, हे मी खोटे सांगत आहे.

०८. मी छायाचित्रणाबाबत विशेष प्रशिक्षण किंवा शिक्षण घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर छायाचित्र सर्व्हे क्र. २१/१/ब चे नाहीत. फोटोवर ते किती तारखेला काढले याची नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फोटो काढलेले आहेत, हे खोटे सांगत आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष

( **शै. वा. उगले** ) ( **शै. वा. उगले** )

मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.

दिनांक : **१२/०९/२०२३.**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **विरेश सिद्धाराम अलगी** |
| वय सुमारे | : | २९ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| सध्या नेमणूक | : | वनरक्षक, पनवेल |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फतः</u>**

सन २०२१ मध्ये मी वनरक्षक बोपोली म्हणून कार्यरत होतो. गाण तर्फे श्रीगांव येथे राहणारे मारुती रामजी पाटील यांनी अतिक्रमण केल्याची आमच्याकडे तक्रार केली होती. सदर तक्रार मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांच्याकडे केली होती. त्याबाबत आम्हाला पत्रव्यवहार करण्यात आला होता. यासदंर्भात आम्ही चौकशीसाठी मौजे गाण तर्फे श्रीगांव येथे गेलो होतो. मारुती पाटील यांचा सर्व्हे क्रमांक २१/१/ब होता.

०२. सदर जागेमध्ये एक हॉटेल, पत्र्याची शेड, गेस्ट हाऊस, तरणतलाव व थोड्या जागेत भातशेती होती. सदर जागेचे मोजमाप केले व जी.पी.एस्. मशीनद्वारे पॉलीगॉन घेतले. तेथे माझ्या व्यतिरिक्त दोन पंच, वनरक्षक उस्मानगणी शेख, रत्नाकर माने वनपाल तिनविरा हजर होते. वनपाल तिनविरा यांनी जागेचे मोजमाप पंच व आम्हाला समजावून सांगितले. आरोपीने त्यावेळी सांगितले की त्यांनी सदर जमीन राधाबाई यांच्याकडून सन १९९७ मध्ये खरेदी केलेली आहे व १९९८ मध्ये शेरा लागलेला आहे.

०३. आरोपीने वनविभागाच्या पूर्वपरवानगीशिवाय वनेतर कामे केलेली होती. तेथे पंचनामा केला. निशाणी क्र. २४ कडील पंचनामा तोच असून त्यावर माझी सही आहे.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. आर. बी. कोसमकर यांचेमार्फत</u>** :

०४. दि. १६/०९/२०१९ ते दि. ३०/०९/२०२१ पर्यंत मी बोपोली येथे कार्यरत होतो. वनरक्षक बोपोली यांच्या कार्यक्षेत्रात गाण तर्फे श्रीगांव हे येत नाही.

प्रश्न : पंचनामा करण्यासाठी तुम्हाला कशा पद्धतीने बोलावले होते?

उत्तर : मला बोलावले नव्हते परंतु कर्तव्याचा भाग म्हणून गेलो होतो.

मी आरोपीच्या जागेची कागदपत्र बघितली होती. ७/१२ च्या उता—यावर आरोपीचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९७ पासून आरोपीचे ७/११ उता—यावर नाव आहे. घराच्या उता—यावर सुद्धा आरोपीचे नाव आहे. सन १९९७ पासून घर व जागा आरोपीच्या नावे आहे. तक्रार आल्यानंतर आरोपीविरुद्ध कारवाई केली. सन १९९७ पासून ते सदर तक्रार येईपर्यंत आरोपीविरुद्ध वनखात्याने कोणतीही कारवाई केली नव्हती. तक्रार येईपर्यंत आरोपीने सदर जागेवर वनेतर कामे केलेली आहेत हे वनखात्याच्या लक्षात आले नव्हते, हे मी सांगू शकत नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो नव्हतो व पंचनाम्यावर कार्यालयात बसून सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा पंचनामा केलेला असून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत | समक्ष

**( शै. वा. उगले )** | **( शै. वा. उगले )**

मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग. | मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

अलिबाग.

दिनांक : **१७/१०/२०२३**.